# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०७/२०२५ (गुरूवार)**

---

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे बदली झालेले अधिकारी यांचा निरोप आणि नव्याने रूजू होणारे अधिकारी यांचा स्वागत समारंभ

दिनांक १०/०७/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे नागपुर ग्रामीण जिल्हयात अपर पोलीस अधिक्षक या पदावर कार्यरत असलेले श्री रमेश धुमाळ यांची अमरावती शहर येथे पोलीस उपायुक्त या पादावर बदली झाल्याने त्यांना नागपुर ग्रमीण जिल्हा पोलीसांच्या वतीने निरोप समारंभ आयोजीत करून त्यांना निरोप देण्यात आला. तसेच उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर या पदावर कार्यरत असलेले श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) यांची अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे नियुक्ती झाल्याने नागपुर ग्रमीण जिल्हा पोलीसांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रमात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी श्री रमेश धुमाळ आणि श्री अनिल म्हस्के,यांना पुष्पगुच्छ देवुन पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री विजय माहुलकर, पोलीस उपाधिक्षक (गृह), नागपुर ग्रामीण,सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व शाखा प्रभारी अधिकारी हजर होते.


महाराष्ट्र पोलीस
अधीक्षक
ग्रामीण


महाराष्ट्र पोलीस
पोलीस

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## ११ गोवंश जनावरांची सुटका,बोरी पोलसांची कामगिरी
## १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक १०/०७/२०२५ रोजी बोरी पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड बायपास रोडने बोलेरो पिकअप मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी उमरेड बायपास रोड येथे रेल्वे ओव्हरब्रीज समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम. एच. ४० सी.टी. ०७४४** येताना दिसले. पोलीसांना पाहुन त्यातील दोन इसमांनी काही अंतरावर वाहन थांबवुन वाहन सोडुन पळुन जावु लागले.पोलसांनी शिताफिने पाठलाग करून एकाला पकडले.त्याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **आर्यन सत्यवान दुपारे, वय १९ वर्षे, रा. बुध्द विहाराजवळ, भिवापुर जि. नागपुर ,असुन तो क्लिनर असल्याबाबत माहीती समजली**. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **११ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावर खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ४० सी.टी. ०७४४ किंमती १०,००,०००/— रूपये. व १४ गोवंश जनावरे किंमती १,१०,००० /— रूपयाचा एकुण किंमती ११,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या ११ गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन श्रीकृष्ण गौशाळा, तुरकमारी ,बुटीबोरी येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद प्रकरणी वाहन चालक,मालक आरोपी आणि क्लिनर आरोपी नामे आर्यन सत्यवान दुपारे, वय १९ वर्षे, रा. बुध्द विहाराजवळ, भिवापुर जि. नागपुर याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.**


# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ३ लाख २२ हजार ५२० रूपयांचा मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक **१०/०७/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की** मौजा खदान ०३ येथे खुल्या जागेत काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) सोनु रामचंद्र भगत, वय ३३ वर्ष रा. वार्ड क्र ०१, हरीहर नगर कांद्री, कन्हान त.पारशिवनी २) धुरेंद्र इंद्रदेव राय, वय ५२ वर्ष रा. शिवगिरी शाळेच्या मागे, खदान क्रं ०३, त.पारशिवनी ३) रमाकांत दयादिन कश्यप, वय ४० वर्ष ,रा.खदान क्रं ०६, कन्हान त.पारशिवनी ४) सतिष लच्छीराम धुर्वे, वय ३८ वर्ष रा. कॉलरी क्रं ०४ टेकडी ता पारशिवनी , ५) सियाराम रामकृष्ण यादव, वय ४२ वर्ष रा.शिवनगर,कांद्री, कन्हान , ६) सादीक अली वल्द अब्दुल मजीद, वय ५२ वर्ष रा. खदान क्रं ३, कन्हान ,७) विजय जित राउत, वय ४५ वर्षे, रा. खदान क्रं ०६ कांद्री, कन्हान त.पारशिवनी ८) सुनिल जवाहर गुप्ता, वय ३४ वर्षे, रा. रामनगर, कन्हान त.पारशिवनी, ९) मोहम्मद शारिक वल्द शरिफ खान , वय ४५ वर्षे, रा. भगत सिंग वार्ड सिवनी, राज्य मध्यप्रदेश हे** ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन **५२ तास पत्ते व रोख रक्कम , ९ अॅड्रॉईड मोबाईल, ४ मोटर सायकल सह एकुन मिळालेला माल ३,२२५२०/रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. नमुद ९ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने,अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणाऱ्यांवर गुन्हा नोंद

दिनांक ०९/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १०/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत जुनी वस्ती येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान करून ३२ संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. तसेच अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे गुन्हा नोंद करण्यात आला . सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार यांच्या सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.











# नागपुर ग्रामीण जिल्हयातील दिर्घकालीन अनाधिकृतपणे गैरहजर असलेल्या १ अधिकारी आणि १२ अंमलदारांना करण्यात आले निलंबित

पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले १ अधिकारी आणि १२ अंमलदार असे एकुण १३ अधिकारी/अंमलदार हे दिर्घकालीन अनाधिकृतपणे ८५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी पासुन कर्तव्यावर गैरहजर असल्याने आज दिनांक १०/०७/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी जिल्हा विशेष शाखा येथे नेमणुकीस असलेले १ पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असलेले १ पोलीस हवलदार, ३ नाईक पोलीस अंमलदार आणि ४ पोलीस अंमलदार, पोलीस नरखेड येथील १ पोलीस हवलदार, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील १ पोलीस हवलदार , पोलीस स्टेशन सावनेर येथील १ नाईक पोलीस अंमलदार , मोटर परीवहन विभाग येथील १ चालक पोलीस अंमलदार अशा एकुण १३ अधिकारी/अंमलदार यांना निलंबित केले आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने